e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"

Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# वैदर्भीय ग्रामीण कादंबरी संहिता लेखन : एक आकलन

**डॉ.तीर्थराज रा. कापगते**[1]

मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख,

श्री लेमदेव पाटील महाविद्यालय मांढळ, नागपूर

**प्रा.तेजस्विनी नामदेवराव ठाकरे सोनटक्के**[२]

संशोधक,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.59

नव्वदोत्तर वैदर्भीय ग्रामीण कादंबरी हा ग्रामीण साहित्याचा असा प्रकार आहे की, जो ग्रामीण जीवनाचा अस्सल आरसा ठरतो. विदर्भ हा महाराष्ट्राचा महत्त्वाचा भूभाग असून, तेथील ग्रामीण जीवनाच्या समस्या, संघर्ष, परंपरा हे वैदर्भीय ग्रामीण साहित्याचा आधार आहे.नव्वदोत्तर वैदर्भीय ग्रामीण कादंबरी ही ग्रामीण जीवनशैलीचे ,आर्थिक स्थितीचे व सांस्कृतिक जडणघडणीचे यथार्थ दर्शन घडवते. अशा या ग्रामीण साहित्याच्या विविध प्रवाहा मध्ये नव्वदोत्तर वैदर्भीय ग्रामीण कादंबरी महत्त्वाची भूमिका बजावते. विशेषता वैदर्भीय ग्रामीण कादंबऱ्यात विदर्भातील राजकीय, सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक जीवनाचे प्रामाणिक चित्रण चित्रित करतात. विदर्भातील शेतकऱ्यांचे प्रश्न, राजकारणात स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन, निसर्गाशी असलेले अतूट नाते, सर्वसामान्य ग्रामीण स्त्रियांची स्थिती व जागतिकीकरणाच्या प्रभावाखाली समाज व त्यांचे वास्तवदर्शी प्रतिबिंब असे अनेक घटक नव्वदोत्तर वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतून दिसून येते. या संशोधनात वैदर्भीय ग्रामीण कादंबरीची शैली, गुणवैशिष्ट्ये व समाजशास्त्रीय संदर्भाचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने खालील विवेचन करण्यात आले आहे.

१ ) वैदर्भीय ग्रामीण कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये

**ग्रामीण जीवनाचे चित्रन..**

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी 80 टक्के लोकसंख्या ही खेड्यात वास्तव्य करीत आहे. सहाजिकच या लोकांच्या जीवन,जाणिवा साहित्यात १९६० नंतर अधिक वास्तव दर्शी साहित्यात चीतित्रीत केल्या जाऊ लागल्या. ग्रामीण जीवनाचे उपजीविकेचे मुख्य साधन शेती असल्यामुळे शेती हा घटक ग्रामीण समाजाचा केंद्रवर्ती असल्याचे दिसून येते व त्यातूनच कृषीनिष्ठ संस्कृती निर्माण झाली. जीवन जगण्याचा एक आकृतीबंध निर्माण झाला.यासंदर्भात आनंद यादव लिहितात, " खेडेगाव तेथील जीवन पद्धती, तेथील निसर्ग,शेती, मानवी मन, प्रदेशनिष्ठ वैशिष्ठ पूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेले काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या

© 2024, SK Publisher All Rights Reserved

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 296-300

आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा, व त्यातून उद्भवणारे प्रश्न, समस्या या सर्व गोष्टींना ग्रामीणतेचे वैशिष्ट्य आनंद यादव यांनी मांडले." १

यावरून असे म्हणता येईल की, वैदर्भीय ग्रामीण कादंबरी वस्तुनिष्ठ जीवनशैली चालीरीती, परंपरा, जगण्याचे संदर्भ इत्यादींचे प्रामाणिक चित्रण करतात.

**निसर्ग आणि जीवन...**

दीर्घ काळापासून एकाच भूभागात वास्तव्य करणाऱ्या लोकसमूहाची एक विशिष्ट संस्कृती, त्यांची बोली, विधी, परंपरा, सन, उत्सव, पोशाख, जन्ममृत्यू विषयी विचार हे सर्व इतर प्रदेशातील लोकांपेक्षा सहाजिकच वेगळे असतात. विशिष्ट प्रदेशातील निसर्ग व तेथील लोकजीवन त्यांच्या गुणवैशिष्ट्यांसह साहित्यात उतरवणे हेच वैदर्भीय कादंबरीचे लक्षण दिसून येते. तेथील लोकजीवनाला केंद्रस्थानी ठेवून वास्तवाला कल्पनेने साहित्यात चित्रीत करण्यात आले. एक विशिष्ट प्रदेश, लोकजीवन या सर्वांचा वापर करीत विदर्भ आकार घेत असतो. या संदर्भात नामदेव व्हटकर म्हणतात, " निरनिराळ्या भौगोलिक प्रदेशात जमिनीचे प्रकार, हवामान, आणि त्या प्रदेशाचा शेकडो वर्ष घडत असलेला इतिहास यामुळे तेथील लोकसमुदायाची एक विशिष्ट अशी मनोवृत्ती बनून गेलेली असते " २

म्हणजेच वैदर्भीय ग्रामीण कादंबरी मध्ये निसर्गाच्या सौंदर्यासोबतच एकरूप झालेले त्यांचे जीवन व त्यांच्या पद्धतीचे वर्णन दिसून येते.

**संघर्ष आणि समस्या...**

राजकारण, सर्वसामान्य शोषिक स्त्री, जाती-जातीय भेद, दंगली, निसर्ग आधारित शेती समस्या, पोटासाठी करावे लागणारे स्थलांतर व त्यातही जीवघेणा संघर्ष, तरुणांची शिक्षणाविषयी असणारी अनास्था, या सर्व समस्यांचे प्रत्यंतर सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' या कादंबरीत दिसते. शिक्षित एकनाथाला नोकरी नसल्यामुळे एकंदरीत जीवनाविषयी अनास्था दिसून येते. तसेच रमेश अंधारे यांची 'दगडीमत्ता', प्रतिमा इंगोले यांची, 'बुढाई', किशोर सानप यांची 'हारास' या कादंबरीत एका स्त्रीची सुरुवात आणि शेवट देखील राजकारणातच कसा होतो? हे दाखवले. रवींद्र शोभणे यांच्या ' कोंडी ' कादंबरीत एका तरुणांची आयुष्यभर होत असलेली कोंडी चित्रित केली आहे. थोडक्यात नव्वदोत्तर वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतील कथानकांची गुंफण ही संघर्ष व समस्यांवर आधारावर केलेली दिसते.

2) नव्वदोत्तर वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतील महत्वाचे विषय -

**वऱ्हाडी भाषेची प्राचीन परंपरा...**

मानवी समुदायाचा व्यवहार हा बोलण्यातून सुरू होतो व त्यामधूनच त्याला जगातील व्यवहाराचे ज्ञान मिळते अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून भाषा आवश्यक आहे मानवी मुखातून निघणाऱ्या ध्वनीच्या साह्याने भाषा तयार केली व त्या ध्वनीलाच नंतर वर्ण म्हणू लागले वर्णमालेतूनच अक्षरे आणि त्या अक्षरापासून शब्द व नंतर वाक्य तयार झाले या वाक्यातून भाषा तयार झाली व भाषेचे शास्त्र निर्माण झाले प्रतिमा इंगोले यांच्या मते, " भाषा म्हणजे ध्वनी तो प्रकटतो लोकांच्या मुखाने म्हणून लोकांची भाषा असते पतंजली म्हणतात, लोक थोडा


Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"
Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.
(Sponsored by: Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 296-300

थोडा अर्थ भरून शब्द प्रयोग करतात ज्याला घड्याचे काम आहे तो कुंभार वाड्यात जाऊन म्हणतो घडा बनव तसा काही व्याकरण करांच्या घरी जाऊन कोणी शब्द बनवत नाही म्हणून भाषा ही खरी लोक भाषा असते " ३

थोडक्यात मराठी भाषेचे वराडी हे तान्हे बाळ आहे म्हणूनच महाराष्ट्राची ती मायबोली असून तीच खरी लोकभाषा आहे जेव्हा विदर्भ स्वतंत्र नावाने जन्मास आला तेव्हा सोबत भाषेलाही मराठी नावाने संबोधू लागले .

**वैदर्भीय संत...**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे असे म्हटले जाते.सोबतच वैदर्भीय संतांनी दिलेली कामगिरी देखील मोलाची ठरते. त्यात कर्मयोगी गाडगे महाराज, गुलाबराव महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या संतांचा उल्लेख अनिवार्य ठरतो अशा अनेक विदर्भातील संतांनी मोठ्या प्रमाणात वांग्मयाची देण विदर्भाला दिली आहे. त्यांचे साहित्य लिखित व मौखिक परंपरेने असल्याने ते लोक जीवनाशी समरस होते आणि म्हणूनच त्यांना लोकसाहित्यकार म्हणावे लागले.

**विदर्भातील सण उत्सव...**

हिंदू समाजात गुढीपाडव्यापासून नवीन वर्षाची सुरुवात होते असे मानले जाते आणि येथूनच हिंदू धर्माचे नाविन्यपूर्ण सण, उत्सव, व्रतवैकल्ये यांना सुरुवात होते. विदर्भातील महत्त्वाच्या संना पैकी गुढीपाडवा, दिवाळी, दसरा, संक्रांत अशा सणांवर येथेथील हवामान, तो प्रदेश या सर्वांचे रंग सणवाराला लाभलेले असतात. जसे मकर संक्रांत म्हणजे सूर्यदेव तेची पूजा. तिळगुळाचा सण इत्यादी वैदरभीय ग्रामीण कादंबरीवर झालेला बदल तसेच परंपरेतील झालेले स्थित्यंतर दिसून येते.

**महिला दृढीकरण...**

वैदर्भीय ग्रामीण कादंबरीवर जागतिकीकरण यांत्रिकीकरण, औद्योगीकरण या सर्व घटकाचा परिणाम ग्रामीण माणसावर सर्वतोपरी झाला आहे. काही सकारात्मक तर काही नकारात्मक आणि याच पार्श्वभूमीवर झालेला चांगला वाईट परिणामाचा वेध वैदर्भीय कादंबरीने घेतला आहे. बदलत चाललेले खेडे, मूल्ये, वैरभावना या सर्वांची घुसमट दिसून येते. वैदर्भीय ग्रामीण कादंबरी समस्याच मांडत नाही तर त्यावर ठाम व ठोसपणे उपाययोजना ही मांडताना दिसते. स्त्रीचे काबाडकष्ट कुटुंबाचा गाडा चालवण्यासाठी स्वतःच्या मानेवर घेतलेले जुमफन, स्त्री म्हणून तिच्या वाट्याला आलेले दुय्यमत्व, याचा समर्थपणे व सक्षम पणे ग्रामीण कादंबरीत विस्तृत स्वरूपात घेतलेला दिसतो. ग्रामीण तसेच शहरी सुशिक्षित स्त्रियांच्या समस्या दाखवून त्यांच्यावर उपाय योजना सुचवणारे कथानक आहेत. कृष्णात खोत यांची, ' रौंदळा ', 'गावठाण', प्रतिमा इंगोले यांची, ' बुढाई ' बोडखी ' 'पार्टटाईम ' बाबाराव मुसळे यांची, ' पाटीलकी,' या कादंबऱ्यात वास्तव चित्रण केलेले दिसते.

**शैक्षणिक स्थिती...**

राजकारणासाठी तरुणांचा होणारा वापर, बेरोजगारांची वाढती संख्या आणि त्यांचा समाज मनावर होणारे विपरीत परिणामांचे यथोचित वर्णन दिसून येते. जसे, ' बारोमास 'मधील एकनाथ, ' पार्ट टाइम 'मधील अनुराधा , 'कोंडी ' मधील वसंता इत्यादी.

**सामाजिक समस्यांचे प्रतिबिंब...**

उपरोक्त कादंबऱ्यातून विदर्भातील गरिबी, उपासमारी, लाचारी शिक्षणाचा अभाव तसेच आरोग्य, राजकारण यांसारख्या समस्यांवर प्रकाश टाकला आहे.

**साहित्यिक शैली...**

लेखन शैली सरळ काळाला अनुरूप प्रवाही, मानवी संवेदनांना कवेत घेणारी, कधी मानवी कृत्यांना दगड संबोधणारी, तर कधी पाषाण रुपी दगडाला पाझर फोडणारी असून, विदर्भातील ग्रामीण बोलीभाषेचा व प्रमाण भाषेचा वापर ही प्रभावी असलेला दिसतो.

सांस्कृतिक समृद्धी...

नव्वदत्तर वैदर्भीय ग्रामीण कादंबरी ग्रामीण जीवनातील परंपरा, रुढी, सण उत्सव आदींचे जिवंत वर्णन करतात.

3) वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतील महत्त्वाच्या साहित्यिकांचे योगदान...

: सदानंद देशमुख यांच्या, ' बारोमास 'कादंबरीत ग्रामीण संस्कृतीचे प्रभावी वर्णन आढळते.

: बाबाराव मुसळे यांच्या, ' पाटीलकी ' या कादंबरीत ग्रामीण स्त्रीचे संघर्षमय जीवन तिची शोकांतिका समाजात असणाऱ्या सामाजिक स्थितीचे वास्तववादी चित्र आढळते.

: प्रतिमा इंगोले यांच्या, 'पार्टटाइम ' कादंबरीत स्त्री विषयी पुरुष सत्तेचा व संस्था चालकाचा दूषित दृष्टिकोन दिसून येतो.

: किशोर सानप यांच्या, 'हारास ' कादंबरीत राजकारणातील शोषित स्त्रीचे वर्णन दिसून येते.

: ' तहान ' या कादंबरी सदानंद देशमुख यांनी शेतकरी आणि श्रमिक जीवनावर आधारित कथानक दिसून येते..

**निष्कर्ष...**

नव्वदोत्तर वैदर्भीय ग्रामीण सहितालेखन ग्रामीण जीवनाचा व्यापक आणि वस्तुनिष्ठ प्रामाणिक अभ्यास करते तसेच नवोदत्तर वैदर्भ ग्रामीण कादंबरी ही शहरी आणि ग्रामीण समाजातील दुवा म्हणून महत्त्वाची भूमिका बजावताना दिसते त्याचप्रमाणे वाचकांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करत एक सकारात्मक बदल घडवण्याचे साधन बनते.

थोडक्यात या संशोधनाचा उद्देश वैदरभीय ग्रामीण कादंबरीतील जीवनदृष्टी साहित्यिक मूल्य आणि सामाजिक सांस्कृतिक स्थिती यांचा सखोल अभ्यास करणे हा आहे.

## संदर्भसूची

1) आनंद यादव ग्रामीणता साहित्य आणि वास्तव मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे प्रथम आवृत्ती 1981 पृ क्र 121

2) ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध डॉ. नागनाथ कोत्तापल्ले स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद द्वितीय आवृत्ती डिसेंबर 2010 पृ क्र 21

3) डॉ. आनंद यादव ग्रामीणता साहित्य आणि वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, द्वितीय आवृत्ती 1993 पृ क्र 121

:::. Cite this article .:::

कापगते, डॉ.तीर्थराज रा. & सोनटक्के, प्रा. तेजस्विनी नामदेवराव ठाकरे. (2024). वैदर्भीय ग्रामीण कादंबरी संहिता लेखन : एक आकलन. Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 296–300. https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.59